दै. देशोन्नती दि. १२/०७/२०२२

# तामसा पोलिस ठाण्यावर हल्ला करणाऱ्या २६ आरोपींना ५ वर्ष सक्तमजुरी

## प्रत्येकी २१ हजार रुपये दंड

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ भिमा कोरेगाव घटनेनंतर तामसा पोलिस ठाण्यावर दगडफेक करुन शासकीय वाहनांचे नुकसान करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.ई.बांगर यांनी ५ वर्ष सक्तमजूरी व विविधि कलमान्वये प्रत्येकी २१ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. यातील एक आरोपी अद्याप फरार आहे.

पुणे जिल्ह्यातील भिमा कोरेगाव येथे सन २०१८ मध्ये घडलेल्या घटनेनंतर हदगाव तालुक्यातील एका बालकाचा मृत्यू झाल्यामुळे तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे तामसा ठाण्याचे सपोनि रावसाहेब पवार व पोलिसांचा फौजफाटा तामसा येथे ३ जानेवारी २०१८ रोजी तैनात करण्यात आला होता. तामसा येथील बौध्द अनुयायी व भिम टायगर सेनेच्या वतीने तामसा बंदचे आवाहन केल्यामुळे पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. यावेळी पोलिसांनी भिम टायगर सेनेच्या काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत चर्चा केली. परंतू संबंधीत कार्यकर्त्यांची दिशाभूल करुन शासनाविरुध्द घोषणा करत पोलिसांविरोधी संभ्रम निर्माण करुन दिला. त्यामुळे काही कार्यकर्त्यांनी तामसा पोलिस ठाण्याच्या परिसरात प्रवेश करुन दगडफेक करण्यास सुरुवात केली. त्यामुळे शासकीय वाहन क्र.एम.एच.२६ आर.४३५ या जीपच्या काचा फुटल्या असून पोलिस कर्मचारीही जखमी झाले होते. या प्रकरणी सपोनि रावसाहेव पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तामसा पोलिसांनी २७ जणांसह इतरांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा तपास करणारे सपोनि सुनिल माने यांनी २७ जणांविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात न्यायालयाने ६ साक्षीदार तपासले. सबळ पुरावा ग्राह्य धरुन २६ आरोपींना अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.ई.बांगर यांनी कलम ३५३ नुसार ५ वर्ष सक्तमजूरी, कलम ३३२ नुसार ५ वर्ष सक्तमजूरी, कलम १४३ अन्वये ६ महिने शिक्षा व १ हजार रुपये दंड, कलम १४७ अन्वये ६ महिने शिक्षा व १ हजार रुपये दंड, कलम १४८ अन्वये १ वर्ष शिक्षा व २ हजार रुपये दंड असा प्रत्येकी २१ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली असून ५ वर्ष सक्तमजूरीची शिक्षा सुनावण्यात आली. या सर्व शिक्षा एकाच वेळी भोगावयाच्या आहेत. याप्रकरणात सरकार पक्षाची बाजू सहाय्यक सरकारी वकिल ॲड. रणजित देशमुख यांनी सांभाळली.

### शिक्षा सुनावलेल्या आरोपींची नावे

तामसा प्रकरणात शिक्षा सुनावलेल्या आरोपींमध्ये अमोल रावळे, जयकिंग रावळे, तानाजी उर्फ रवी अचलखांबे, मंगेश शेळके, रविंद्र शेळके, विनोद शेळके, रवी वाघमारे, संदिप हनवंते, अष्टदिप हनवंते, धम्मवीर हनवंते, नितीन जाधव, दिपक जाधव, नितीन खंदारे, देवानंद जाधव, मारोती तुपसाखरे, राजू नारळे, कचरु वाठोरे, अक्षयकुमार नारळे, पांडुरंग नरवाडे, संघपाल कांबळे, प्रमोद वाठोरे, संदिप जाधव, मिलींद कांबळे, रमेश कदम, धम्मपाल कदम, मधुकर नारळे यांचा समावेश आहे.